<u>नि.फौ.ख.क्र.५८३/२००८</u>
**महाराष्ट्र सरकार वि. राजू रफिक शेख व इतर**
**निशाणी क्रमांक ०३**

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. २**
साक्षीदाराचे नाव- नितीन भागवत पाटील,
वय. ५० वर्ष, धंदा.- नोकरी,
रा. इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे.

**<u>सरतपास शपथेवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे सरकारी पक्षातर्फे श्रीमती क्रांती कुरळे वकील यांच्यातर्फे सुरु</u>**

माझा इंद्रायणीनगरमधील फ्लॅट भाड्याने एजंट मार्फत दिलेला होता. सदरचा फ्लॅट हा राणी अदवानी यांना नोटरी दस्त करुन दि.१५.०४.२००८ रोजी दिला होता. दि.०२.०५.२००८ रोजी पेपर बातमी वरुन मला कळाले की, माझ्या फ्लॅटमध्ये राजू शेख उर्फ राजू बंगाली यास पाच मुली ठेवून वेश्या व्यवसाय करत होता या आरोपाअंतर्गत अटक केली होती. राणी अदवानी या त्या घटनेनंतर फरार झाल्या. त्यानंतर त्या कधीही भेटल्या नाहीत. मी आरोपीला ओळखत नाही. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**
**<u>उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

**सही/-**
( श्रीमती अ.ई. आवटी )
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**पिंपरी, पुणे.**

**दिनांक- १२.११.२०२५**